“सर्वांसाठी घरे -२०२२” या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

नगरविकास विभाग,

शासन निर्णय (शुध्दीपत्र) क्रमांक :- एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०१९

संदर्भ :- समक्रमांक दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ चा शासन निर्णय

शासन निर्णय (शुध्दीपत्र):-

उपरोक्त संदर्भाधीन निर्गमित शासन निर्णयातील कांही **“अटी व शर्ती”** सुधारित करण्यात येत असून, ह्या संबंधीत अटी आता खालीलप्रमाणे वाचाव्यात. खालील नमूद अटी व शर्ती व्यतिरिक्त असलेल्या इतर अटी व शर्ती या पूर्वीप्रमाणेच वाचण्यात याव्यात.: -

(१) **संदर्भाधीन शासन निर्णयातील अट क्र.०३ मधील (अ) खालीलप्रमाणे वाचण्यात यावी.:-**

(अ) अशी अतिक्रमणे नियमानुकूल करताना अनुसूचित जाती/अनुसूचीत जमाती/इतर मागासवर्गीय/ **आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील** अतिक्रमण धारकाकडून कब्जेहक्काच्या रकमेची आकारणी करण्यात येऊ नये.

(२) **संदर्भाधीन शासन निर्णयातील अट क्र.०६ खालीलप्रमाणे वाचण्यात यावी :-**

(६) असे अतिक्रमण नियमित करताना, अशी अतिक्रमित जमीन मंजूर/प्रारुप विकास योजनेमध्ये कोणत्याही सार्वजनिक/निमसार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असल्यास व सदर जमीन प्रधानमंत्री आवास योजनेकरिता आवश्यक असल्यास आणि नागरी स्थानिक संस्थेने तसा प्रस्ताव सादर केल्यास, जिल्हाधिकारी या क्षेत्रावरील **आरक्षणाबाबतचा आवश्यक** तो प्रस्ताव उचित कार्यवाहीसाठी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करील.

(३) **संदर्भाधीन शासन निर्णयातील अट क्र.०७ (अ) खालीलप्रमाणे वाचण्यात यावी :-**

(१) प्रथम टप्प्यात, वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र लाभार्थ्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावीत.

(२) त्यानंतर, अशा अतिक्रमीत जमीनीचा एकत्रितात अभिन्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने तयार करावा व मंजूर करुन घ्यावा.

(३) त्यानंतर, या क्षेत्राचा पुर्नविकास करतेवेळी, या मंजूर अभिन्यासानुसार कार्यवाही करणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

(४) उपरोक्त प्रमाणे अभिन्यास करताना शक्यतो महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील व विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार आवश्यक त्या सोयीसुविधा ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

(५) तथापि असा अभिन्यास तयार करताना, विकास नियंत्रण नियमावलीतील काही तरतुदी शिथील करुन घेणे आवश्यक असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी अशा शिथीलीकरणासाठी आवश्यक प्रस्ताव संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावा व संचालकांच्या मंजुरीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(४) **संदर्भाधीन शासन निर्णयातील अट क्र.०७ (ब) खालीलप्रमाणे वाचण्यात यावी :-**

"अशा क्षेत्रावरील आरक्षणाबाबत अभिन्यास मंजूर करतांना आवश्यक त्या शिथीलता देण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत. नगरविकास विभागाने (नवि-१) याबाबत अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी."

०२. सदर शासन निर्णय (शुध्दीपत्र) महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संकेताक २०१९०२२६१५५७५६०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.02.26 16:02:04 +05'30'

(सं.श.गोखले)

सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
२) मा.मुख्य सचिव
३) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग/गृहनिर्माण विभाग/महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, (नवि-१/नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व विभागीय आयुक्त,/ सर्व जिल्हाधिकारी
७) जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) सर्व महानगरपालिका आयुक्त (मुंबई महानगरपालिका वगळून)
९) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
१०) सर्व नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी,
११) सर्व जिल्हा अधिक्षक भूमीअभिलेख
१२) प्रधान सचिव (नवि-२) यांचे वि.का.अ.
१३) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती, कार्यासन नवि-१८.